# SUPRITENDENT OF POLICE
# PALGHAR

near court, bidko road, navali, dist. Palghar 401404. ph - 02525-252100 email- pi.sec.palghar@gmail.com

2016 - 2017

*e - TENDER*

## BOAT HIRE FOR PATROL

**E-TENDER NO 01 ( palghar) , www.palgharpolice.gov.in**

# अटी व शर्ती

१) यांत्रीकी नौका/ट्रॉलर्स बांधणी हि वर्ष १९९५ ते २००० ची असावी .
२) यांत्रीकी नौका/ट्रॉलर्स महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डकडे नोंदणी कृत असावी.
३) यांत्रीकी नौका/ट्रॉलर्स लाकडी कींवा फायबर असावी.
४) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचा वेग अविरत १२ नॉटीकल मैल प्रतीतास व पुर्ण भारीत अवस्थेत जास्तीत जास्त १३ नॉटीकल इतका वेग असावा.
५) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे इंजिन हे कमीतकमी १०० ते २०० अश्वशक्तीचे असावे.
६) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सची लांबी हि ७५ ते १०० फुट लांब व बिम १५ फुट रुंद कींवा जास्त असावे.
७) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सची सतत सात दिवस समुद्रात चालण्याची क्षमता असावे.
८) यांत्रीक नौका/ट्रॉलर्स इतर शासकीय किंवा बिगर शासकीय संस्थाना भाडे तत्वावर दिले बाबत अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.
९) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सची सागरी गस्तीचे काम संपुर्ण २४ तास राहील तसेच त्यात दोन ते तीन तास विश्रांतीचा काळावधी असेल
१०) यांत्रीक नौका/ट्रॉलर्स वर बसण्यासाठी आवश्यक ती सुविधा असणारी १०×७× ६ची कॅबीन असावे.एका वेळी ८ व्यक्ती बसतील अशी व्यवस्था असावी. तसेच फक्त सयुक्त गस्तीवर असणाऱ्या अधीकारी व कर्मचारी यांनाच अल्पोपहार चहापाणी (जेवणाची ) व्यवस्था करण्यात यावे. तसेच सर्व सोयीयुक्त असे शौचालय व प्रथमोपचार बॉक्सची सोय केलेली असावी.
११) यांत्रीक नौका/ट्रॉलर्समध्ये लाईटसाठी स्वतंत्र विद्युत जनित्राची सोय केलेली असावी.
१२) यांत्रीक नौका/ट्रॉलर्समध्ये कॅबिनवर शक्तीशाली सर्व दिशांना फिरणाऱ्या सर्चलाईटची सोय केलेली असावी.
१३) यांत्रीक नौका/ट्रॉलर्समध्ये ॲल्डीज लाईटची व्यवस्था केलेली असावी.
१४) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सवर कायम स्वरुपी सुस्थितीतील कीमान १५ लाईफ जॅकेट्स,अग्निशामक सामग्री व वाळुणे भरलेल्या कीमान २ बादल्या आहेत.तसेच एम.एम.बी ने दिलेले सुरक्षा सामुग्रीचे प्रमाणपत्र असावे.
१५) समुद्रात २५ ते ३० कि.मी. वेगाने वाहनाऱ्या वाऱ्यात टिकण्याची यांत्रीक नौका/ट्रॉलर्सची क्षमता असावी. ती तपासण्याचे अधिकार मा.पोलीस अधीक्षक पालघर यांना राहतील.
१६) भाडयाने घेण्यात आलेल्या यांत्रीक नौका/ट्रॉलर्सना सागरी गस्ती व्यतिरीक्त अन्य कोणतेही कामासाठी वापरले जाणार नाही.
१७) सागरी गस्तीसाठी भाडयाने घेण्यात आलेल्या यांत्रीक नौका/ट्रॉलर्स हे २४ तास पालघर पोलीसांच्या ताब्यात राहतील .गस्तीपथक प्रमुख यांचे आदेशाप्रमाणे गस्तीचे काम करण्यात येइल.
१८) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सची नोंदणी मर्चट शिपींग ॲक्ट २००० साली एम.एम.बी कडे केलेली असावी.
१९) यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालकाचे /ठेकेदाराच्या वतीने यांत्रीक नौका/ट्रॉलर्सवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यापैकी तांडेल व्यतिरीक्त ३ खलाशी ठेवण्यात यावे. त्यापैकी एका कर्मचाऱ्यास यांत्रीक नौका दुरुस्त करण्याचे ज्ञान असावे.तसेच यांत्रीक नौका/ट्रॉलर्स चालकास (तांडेल) स्थानिक भाषा , स्थानिक बंदर व समुद्राचे भौगोलीक ज्ञान असावे.
२०) यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांचे व त्यांच्या कर्मचाऱ्याचे पुर्व चारित्र्यबाबतची पोलीस खात्यामार्फत तपासणी केलेली असावी.
२१) यांत्रीक नौका/ट्रॉलर्ससाठी कराव्या लागणाऱ्या अनुषगिक खर्चा बरोबर तांडेल व खलाशी यांचे भोजन,चहापान व वेतन तसेच सागरीगस्तीसाठी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याची चांगल्या प्रतिचे भोजन व्यवस्था व चहापान व्यवस्था व रोजच्या रोज पीण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था करुण तसेच यांत्रीक नौका/ट्रॉलर्स ते धक्का (जेट्टी) यादरम्यान टोनीची व्यवस्था विनाशुल्क असावी.
२२) खाजगी यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालकाने/ठेकेदराने भाडयाची दिलेली यांत्रीक नौका /ट्रॉलर्स ना दुरुस्त झाल्यास त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही मात्र त्यांची यांत्रीक नौका/ट्रॉलर्स बंद पडल्यास त्या दर्जाची दुसरी पर्यायी यांत्रीक नौका/ट्रॉलर्स तात्काळ उपलब्ध करुण देण्याची जबाबदारी यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालकाची /ठेकेदारांची राहील

२३) खाजगी यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालकाने/ठेकेदराने भाडयाची दिलेली यांत्रीक नौका /ट्रॉलर्स उपलब्ध न केल्यास ज्यादराने प्रतिदिन भाडे देण्यात येणार आहे.ते भाडे व दिवसाला ५ हजार रुपये दराने दंडात्मक रक्कम यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालक /ठेकेदारांन कडुन वसुल करण्यात येईल.

२४) खाजगी यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालकाने/ठेकेदराने भाडयाची दिलेली यांत्रीक नौका /ट्रॉलर्स ना दुरुस्त झाल्यास लेखी स्वरुपात कळवावे.

२५) यांत्रीक नौका/ट्रॉलर्स मालकाच्या अडचणीमुळे गस्तीसाठी यांत्रीक नौका/ट्रॉलर्स उपलब्ध न झाल्यास त्या दिवसाच्या कालावधीचे भाडे अनुज्ञेय राहणार नाही.तसेच त्या दराने दंडात्मक रक्कम वसुल करण्यात येईल.

२६) यांत्रीक नौका /ट्रॉलर्सची दुरुस्ती नौका/ट्रॉलर्स मालकाने/ठेकेदराने स्वखर्चाने करण्याची जबाबदारी राहील. यांत्रीक नौका /ट्रॉलर्स तत्काळ उपलब्ध करुण न दिल्यास पोलीस अधीक्षक पालघर ठरवतील त्या प्रमाणे दंड भरावा लागेल.

२७) यांत्रीक नौका /ट्रॉलर्स २४ तास वापरण्यास वापरावी लागेल.

२८) यांत्रीक नौका /ट्रॉलर्समध्ये काम करणारे अधिकरी /कर्मचारी यांचा मा.पोलीस अधीक्षक हे आदेश देतील त्याप्रमाणे वैद्यविमा उतरविणे ग्रुप इन्स्पेक्टर कस्टम – १ रु. ५ लाख,एएसआय /हेडकॉन्स्टेबल पोलीस १ रु. ५ लाख, सेलर ऐटी ऑफीसर- २ (नेव्ही असल्यास) रु.५ लाख प्रत्येकी कॉन्स्टेबल पोलीस -२रु ३ लाख प्रत्येकी व ग्रुप डि ऑफीसर कस्टम-१ रु.३लाख वरिल प्रमाणे वैद्यविमा करावा लागेल.

२९) प्रतिदिन ५० नॉटीकल मैलापेक्षा जास्त गस्त झाल्यास संपुर्ण भाडे देय राहील.५० नॉटीकलपेक्षा कमी गस्त झाल्यास एकुण प्रतिदिन भाडयानुसार येणारी प्रति नॉटीकल मैल भाडे दिले जाईल व खराब हवामानामुळे अजिबात गस्त झाली नाही तर एकुण भाडे ५०००/-(रुपये पाच हजार मात्र) दिले जाईल.

३०) करारातील शर्ती व अटींचा भंग झाल्यास पोलीस अधीक्षक पालघर ठरवतील तेवढा दंड भरावा लागेल.

३१) यांत्रीक नौका /ट्रॉलर्स मालकाने/ ठेकेदाराने यांत्रीक नौका /ट्रॉलर्सचे गस्तीवरिल त्यांच्या कर्मचाऱ्यांची नावे व पत्ते लेखी सादर करावे.

३२) यांत्रीक नौका /ट्रॉलर्सवरिल कर्मचाऱ्यांना मा.पोलीस अधीक्षक पालघर हे ठरवुन दिलेल्या नेव्ही ब्ल्यु व ब्लॅक कॅनव्हास शुज असा गणवेश पुरविण्याची जबाबदारी यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांची राहील.

३३) यांत्रीक नौका /ट्रॉलर्स व त्यांचेवरील तांडेल सह कर्मचारीचे वैद्यविमा असावा.

३४) गस्ती पथकातील अधिकारी कर्मचारी यांचे वर्गवारी प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु.५लाख व रु.३ लाख याप्रमाणे अगर सुधारीत आदेशाप्रमाणे जी रक्कम असेल त्याप्रमाणे विमा यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांना करावा लागेल.

३५) पावसापासुन संरक्षण होणेकामी यांत्रीक नौका /ट्रॉलर्सना प्लास्टिकचे आवरण असावे.

३६) करारदार स्वत: यांत्रीक नौका /ट्रॉलर्सचे मालक असावे.

३७) प्रस्तावीत करार पत्रातील शर्ती व अटी यांचेत बदल करणे सुधारणा करणे त्यात वाढ करणे या बाबतचे अधिकार मा.पोलीस अधीक्षक यांना राहतील.

३८) ट्रॉलर्सवर आवश्यक सुविधाची मागणी सागरी किनारा सुरक्षा पथकाने केल्यास मागणी प्रमाणे यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांना स्वखर्चाने करावी लागेल.

३९) ट्रॉलर्सवरील शासकीय कर्मचारी/खलाशी तांडेल यांना लाईफ जॅकेट पुरवावे लागतील.

४०) शासनाकडुन नौकेचे भाडे देण्यास विलंब झाल्यास व्याजाच्या रक्कमेची मागणी करता येणार नाही.

४१) यांत्रीक नौका /ट्रॉलर्स भाडयाने घेतल्यावर गस्तीव्यतिरीक्त मच्छीमारी अगर अन्य कामी वापर करता येणार नाही.

४२) यांत्रीक बोटीवर आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा ट्रॉलर्सचा डिझेल खर्च खलाशी व तांडेल यांचे वेतन या वरिल खर्च यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांना करावा लागेल. सदर खर्चाची मागणी मा.पोलीस अधीक्षक पालघर कार्यालय यांचेकडे करता येणार नाही.

४३) ट्रॉलर्स/यांत्रिक बोट २४ तास गस्तीसाठी वापरता यावी यासाठी आवश्यक असणारे खलाशी व तांडेल यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांनी स्वत: उपलब्ध करुण दयावी लागेल.

४४) यांत्रिक बोटीवर खालील सुविधा कायम स्वरुपी उपलब्ध करुन दयाव्या लागतील.

१.जी.पी.एस. २.सर्च लाईट ३.फोकस लाईट ४.गार्ड रेल ५. लाईफ सेव्हींग एक्युपमेन्ट

४५) या व्यतिरीक्त निवेदेतील सर्व अटी व शर्ती यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदारवर बंधन कारक राहतील.

४६) वरिल यांत्रिक ट्रॉलर्सच्या संबंधात तपासणी पथकाने काढलेल्या त्रुटींची पुर्तता त्वरीत करुन दयावी लागेल.

४७) वरिल यांत्रिक ट्रॉलर्सच्या संबंधात मासिक तपासणीमध्ये तांत्रिक त्रुटी आढळुन आल्यास यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदार यांत्रीक नौका/ट्रॉलर्सचे मालक/ठेकेदारचे एका दिवसाचे भाडे दंड म्हणुन भरावे लागेल. सदर च्या त्रुटी सलग तीन तपासणीच्यावर आढळल्यास त्यांचा ठेका करार रद्द करुन सदरच्या ट्रॉलर्सचा ठेका करार रद्द केला जाईल याबाबत सर्व अधिकार मा.पोलीस अधीक्षक पालघर यांनी राखीव ठेवलेले आहे.

पोलीस अधिक्षक पालघर.